श्रावण महिना सुरू असल्याने श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्डमधील फूलबाजारात फुलांची आवक चांगल्या प्रमाणात होत असून, सर्व प्रकारच्या फुलांना चांगली मागणी आहे. त्यामुळे रविवारी शोभिवंत फुलांसह इतर सर्व प्रकारच्या फुलांच्या भावांत गेल्या आठवड्याच्या तुलनेने १० टक्क्यांनी वाढ झाली होती, अशी माहिती अखिल पुणे फूलबाजार आडते असोसिएशनचे अध्यक्ष अरुण वीर यांनी दिली. फुलांचे प्रतिकिलोचे दर पुढीलप्रमाणे : झेंडू : २०-३०, गुलछडी : १६०-२००, कापरी : ३०-४०, शेवंती : ४०-५०, (गड्डीचे भाव) गुलाबगड्डी : ५-१०, गुलछडी काडी : ३०-४०, डच गुलाब (२० नग) : १००-१२०, जर्बेरा : ५०-६०, कार्नेशियन : १५०-२००.

महापालिका अंशदायी वैद्यकीय साह्य योजनेच्या पॅनेलमधून १४ रुग्णालयांना वगळणार

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - महापालिकेतील आजी-माजी नगरसेवकांसह पालिकेच्या सध्या कार्यरत कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी अंशदायी वैद्यकीय सेवा योजना राबविण्यात येते. या योजनेच्या पॅनेलमधून १४ रुग्णालयांना वगळण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षभरात या योजनेअंतर्गत एकाही रुग्णाला दाखल करून न घेणाऱ्या रुग्णालयावर ही कारवाई करण्यात आली आहे.

महापालिका कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी अंशदायी वैद्यकीय योजना राबविण्यात येते. यात कर्मचाऱ्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च महापालिका करीत असते. या योजनेअंतर्गत शहरातील १४० रुग्णालये संलग्न आहेत. योजनेसाठी नियुक्त समितीच्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. शहरातील ३० हून अधिक खाटा असलेल्या रुग्णालयांनाच या योजनेत संलग्न होता येते. परंतु, कोरोनाकाळात महापालिकेने छोट्या रुग्णालयांनाही या योजनेशी संलग्न केले. मात्र, अलिकडे या रुग्णालयांनी अंशदायी योजनेअंतर्गत एकही रुग्णभरती केली नाही. परिणामी, त्यापोटीचे बिलही त्यांनी पालिकेकडे सादर केले नाही. त्यामुळे या १४ रुग्णालयांना अंशदायी योजनेच्या पॅनेलमधून काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

राज्यभरातील कैद्यांच्या दैनंदिन वेतनात वाढ

तब्बल ७ हजार कैद्यांना होणार फायदा

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - राज्यातील विविध कारागृहांत शिक्षा भोगणारे कुशल, अकुशल कैद्यांच्या वेतनात वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार आजपासून (दि. २०) कैद्यांच्या वेतनात वाढ लागू करण्यात आली आहे. शासन निर्णयामुळे वेतनवाढीचा फायदा राज्यातील ७ हजार कैद्यांना होणार आहे. कारागृह विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी वेतनवाढ करण्याबाबत प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला होता. प्रस्तावास शासनाने नुकतीच मंजुरी दिली आहे.

कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी विविध स्तरावर प्राधान्य देण्यात आले आहे. त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सातत्याने उपक्रम राबविण्यात आले आहेत. दरम्यान, कारागृहातून शिक्षा भोगून बाहेर पडणाऱ्यांचे पुनर्वसन करण्यासाठी कैद्यांना रोजगारविषयक प्रशिक्षण दिले जाते. त्याशिवाय कारागृहात विविध उद्योगांत काम करणाऱ्या कैद्यांना शासनाकडून वेतन दिले जात होते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून त्यामध्ये वेतनवाढ झालेली नव्हती. कैद्यांच्या कामाची दखल घेऊन अतिरिक्त पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी वेतनवाढ करण्याबाबत प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला होता. त्यास राज्य शासनाने हिरवा कंदील दाखविला असून, आजपासून वेतनवाढ लागू करण्यात आली आहे.

कुशल कैद्यांना आता दरदिवसाचे ७४ रुपये वेतन दिले जाणार आहे. तर अर्धकुशल कैद्यांना ६७ रुपये, अकुशल कैद्यांना ५३ रुपये, खुला कारागृहातील कैद्यांना ९४ रुपये वेतन देण्यात येणार आहे.

दैनंदिन वेतनापोटी मिळणारी रक्कम टपाल खात्याच्या सुविधेतून कुटुंबीयांना पाठविली जाते. काही कैदी दैनंदिन वेतनातून वकिलांचे शुल्क भरतात. कारागृहातील विविध उद्योगांत काम करत असल्याने त्यांच्यात स्वावलंबनाची भावना निर्माण झाली आहे. कारागृहात सुतारकाम, लोहारकाम, चर्मकला, हातमाग, यंत्रमाग, बेकरी, उपहारगृह, गॅरेज, मूर्तिकाम, होजिअरी उत्पादन, चादर, भांडी, दैनंदिन वापरातील वस्तू तयार करण्याचे उद्योग आहेत.

कैद्यांचे दैनंदिन वेतन

कैदी	पूर्वीचे वेतन	नवीन वेतन (रुपयांमध्ये)
कुशल कैदी	६७	७४
अर्धकुशल कैदी	६१	६७
अकुशल कैदी	४८	५३
खुल्या वसाहतीतील कैदी	८५	९४

"राज्य शासनाने कारागृहातील विविध उद्योगांत काम करणाऱ्या कैद्यांची दैनंदिन वेतनवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ७ हजारांवर कैद्यांना फायदा होणार आहे. कारागृहातील विविध उद्योगांत दररोज काम करणाऱ्या कैद्यांमध्ये यामुळे आणखीन स्वावलंबनाची भावना निर्माण झाली आहे.

- अमिताभ गुप्ता, अतिरिक्त पोलीस महासंचालक, कारागृह विभाग

शेतीपूरक उद्योग व्यवसायामुळे कैद्यांना फायदा

■ कैद्यांना लागणाऱ्या फळभाज्या कारागृहातील शेतात पिकवल्या जातात. शेळीपालन, कुक्कुटपालन, मस्यपालन, गोपालन, मधमाशी पालन, महाबीज उत्पादन, दूग्ध उत्पादन, चंदन लागवड, साग लागवड, गुऱ्हाळ, मशरूम उत्पादन, बायोगॅस प्रकल्प आदी पूरक व्यवसाय कारागृहात आहेत. राज्यातील कारागृहात उत्पादित होणाऱ्या ६६ वस्तू सर्व शासकीय कार्यालयांना खरेदी करणे बंधनकारक आहे. कैद्यांना काम उपलब्ध झाल्याने त्यांना नियमित आर्थिक मोबदला मिळतो. कारागृहातील रोजगारनिर्मिती वाढवण्याची जबाबदारी विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर यांच्याकडे आहे.

लहान मुले साथीच्या आजारांनी बेजार

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - पावसाळ्यामुळे वातावरणात सातत्याने बदल होत असल्याने दहा वर्षांखालील लहान मुलांमध्ये ताप, खोकला, सर्दी, जुलाब, उलट्या, अंगदुखी, डोकेदुखी यांसारखे साथीचे आजार वाढले आहेत. यात शाळकरी मुलांचा सर्वाधिक समावेश असून, एकमेकांच्या संपर्कात आल्याने मुले साथीच्या आजारांना बळी पडत असल्याचे निरीक्षण बालरोग तज्ज्ञांनी नोंदवले आहे.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव वाढीस लागतो. या दिवसांमध्ये लहान मुलांची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होत असते. त्यामुळे ही मुले साथीच्या आजारांना बळी पडतात. मुलांना साथीच्या आजारांपासून बचाव करण्यासाठी नियमित लसीकरण करणे, हातांची स्वच्छता, मास्कचा वापर, रोगप्रतिकारकशक्ती वाढविण्यासाठी आहारात भाज्या, फळांचा समावेश करणे, आजारपणात मुलांना शाळेत न पाठवणे यांसारख्या गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे, असा सल्लाही तज्ज्ञांनी दिला आहे.

पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या घाणीमुळे कॉलरा, टायफॉईड, लेप्टोस्पायरोसिस, कावीळ यांसारख्या आजारांची लागण होत आहे. मुलांमध्ये डोकेदुखी, जुलाब, ओटीपोटात दुखणे, सांधेदुखी, कॉलरा, टायफॉईड, लेप्टोस्पायरोसिस, कावीळ, डेंग्यू यांसारख्या आजारांची लक्षणे आढळून आल्यास त्वरित डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार घ्यावेत. आजारातून बरे झाल्यानंतर तीन ते चार दिवसांनी मुलांना शाळेत पाठवावे, असे बालरोगतज्ज्ञ डॉ. इरफान पल्ला यांनी सांगितले.

"पावसाळ्यात वाढत्या आर्द्रतेमुळे साथीचे आजार वाढत आहेत. सध्या २ ते १० वर्षे वयोगटातील लहान मुले साथीच्या आजारांना बळी पडत आहेत. मुलांना अशा आजारांपासून दूर ठेवण्यासाठी पालकांनी खबरदारी घ्यावी.

- डॉ. वृषाली बिचकर, बालरोगतज्ज्ञ

चोरट्यांनी रोकड, दागिन्यांसह दुचाकी पळवली

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - घराचे दार अर्धवट उघडे ठेवून दारात झोपले असताना, चोरट्यांनी घरातून सोन्याचे दागिने, रोकड आणि घराबाहेर उभी असलेली दुचाकी असा २ लाख ३६ हजार रुपयांचा ऐवज चोरी केला. याप्रकरणी लोणीकंद पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत केतन थोरात (वय २३, रा. वाघोली) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना १२ ऑगस्ट रोजी रात्री अकरा ते सकाळी सहा वाजेपर्यंतच्या कालावधीत हिंगणगाव परिसरात घडली आहे. फिर्यादी हे त्यांच्या राहत्या घराचे दार अर्धवट उघडे ठेवून नातेवाईकासह बाहेर झोपले होते. त्याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी घरातील दागिने आणि घराबाहेर उभी केलेली दुचाकी असा २ लाख ३६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. दरम्यान, सकाळी जेव्हा फिर्यादींना जाग आली तेव्हा त्यांना घरात चोरी झाल्याचे समजले. पुढील तपास अंमलदार चंद्रकांत माने करत आहेत.

ट्रिनिटी कॉलेजच्या प्राचार्यपदी प्रा. ताकवले

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - के. जे. एस एज्युकेशनल इन्स्टिट्यूटच्या ट्रिनिटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी प्रा. अविनाश ताकवले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रा. ताकवले यांनी गेली ३५ वर्षे माध्यमिक, उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयात अध्यापनाचे काम केले आहे. पुणे शहर व जिल्हा मुख्याध्यापक संघ (सेवानिवृत्त), हरगुडे ग्रामविकास संस्थेचे खजिनदार, शिक्षक लोकशाही आघाडी समन्वयक व ताकवले चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्य केले आहे. बालभारतीच्या वाणिज्य विषयाच्या अभ्यास गट सदस्य म्हणून अकरावी आणि बारावीचे पुस्तक लेखन केले आहे. शासनाच्या रात्र प्रशाला सर्वंकष धोरण निश्चिती समितीवर ते सदस्य आहेत.

डॉ सावंत, वैद्य यांचा पुरस्काराने गौरव

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे डॉ. सुरेश सावंत यांना 'जीवनगौरव' पुरस्कार, तर बालकवी डॉ. दासू वैद्य यांना 'ज्येष्ठ कवी, शिक्षणतज्ज्ञ ग. ह. पाटील स्मृती पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिती सभागृहात ज्येष्ठ बालसाहित्यिक, वृत्तनिवेदक अनंत भावे आणि डॉ. न. म. जोशी यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. मंदा खांडगे, राजन लाखे, डॉ. दिलीप गरुड, विलास रासकर, बी. आर. माडगूळकर, भरत सुरसे, वसंत वाघ आदींची उपस्थिती होती.

पुरस्कार सोहळ्यानंतर निमंत्रित कवींचे कविसंमेलन झाले. यावेळी अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या कविता मेहेंदळे, मीरा शिंदे, विश्वनाथ भुजबळ, विजय जगताप, सीमा चव्हाण, विनोद वाघ उपस्थित होते.

एनडीए चौकात दिशादर्शक फलक, पादचारी मार्गाचे काम लवकर करा

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - एनडीए चौकात कोणता रस्ता कुठे जातो याचे दिशादर्शक फलक नागरिकांना समजेल आणि संभ्रमावस्था होणार नाही असे लावावे. तसेच, प्रवासी वाहतूक थांबे, पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग असावा, अशा सूचना खासदार सुप्रिया सुळे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) अधिकाऱ्यांना दिल्या. त्याबाबत केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनाही निवेदन देण्यात येणार असल्याचे सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

एनडीए चौकातील प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर येथे पाहणी करण्यासह आणि नागरिकांना येणाऱ्या अडचणी समजून घेण्यासाठी खासदार सुळे येथे आल्या होत्या. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सविता दगडे, माजी नगरसेवक सचिन दोडके यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना खासदार सुळे म्हणाल्या, एनडीए चौकातील पुलाबाबत स्थानिकांसह अन्य पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा केला. वडगाव येथील कामासंदर्भातही आम्ही गडकरी यांची भेट घेतली. त्याही कामाला लवकरच सुरुवात होईल.

दादांचा प्रश्न योग्यच

ठाण्यातील रुग्णालयात झालेल्या मृत्यूंप्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्र्यांना कोंडीत पकडले असे सुप्रिया सुळे यांना विचारले असता, 'घडलेली घटना दुर्दैवी आहे. दादांनी उपस्थित केलेला प्रश्न हा महाराष्ट्राच्या मनातील प्रश्न आहे,' असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

तरुणांमधील वाढता मधुमेह चिंताजनक बाब

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - देशात टाईप-२ प्रकारच्या मधुमेहाने ग्रस्त असलेल्यांपैकी २५ टक्के हे पंचवीसच्या आतील आहेत. तरुणांमधील वाढता मधुमेह ही चिंताजनक बाब आहे, असे मत मधुमेह संशोधक डॉ. रवींद्र नांदेडकर यांनी व्यक्त केले. अनुयश आरोग्य प्रतिष्ठानतर्फे आंतरराष्ट्रीय युवक दिनानिमित्त 'तरुणांमधील वाढता मधुमेह' या विषयावर डॉ. रवींद्र नांदेडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. 'आर्टिस्ट्री-देणे समाजाचे'च्या संस्थापक-संचालक वीणा गोखले, अनुयश आरोग्य प्रतिष्ठानच्या सचिव रूपाली नांदेडकर, विश्वस्त विलास नेवपूरकर, प्रकल्प समन्वयक विजय निंबाळकर यावेळी उपस्थित होते. यावेळी बालमधुमेह दत्तक योजनेतील लाभार्थी बालकांना वीणा गोखले यांच्या हस्ते मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

टोमॅटो, काकडी, फ्लॉवर, कारली स्वस्त

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्डमध्ये रविवारी फळभाज्यांची आवक वाढली. आवक वाढल्याने टोमॅटो, काकडी, फ्लॉवर, कारली, सिमला मिरचीच्या भावात घसरण झाली होती. तर, कांद्याचे निर्यात शुल्क ४० टक्के वाढ केल्याने कांद्याच्या दरात घसरण सुरू झाली आहे. मागणी व पुरवठा यातील समतोलामुळे इतर बहुतांश सर्व भाजीपाल्याचे भाव गेल्या आठवड्याच्या तुलनेने टिकून होते.

गुलटेकडी मार्केटयार्डमध्ये रविवारी (दि. २०) राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतून सुमारे ११० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. भाजीपाल्याच्या आवकेमध्ये परराज्यांतून झालेल्या आवकेमध्ये कर्नाटक, गुजरात येथून हिरवी मिरची सुमारे १२ टेम्पो, कर्नाटक, गुजरात येथून कोबी सुमारे ४ टेम्पो, आंध्र प्रदेश, तामिळनाडू येथून ४ टेम्पो शेवगा, इंदूर येथून १० टेम्पो गाजर, कर्नाटक येथून घेवडा ४ टेम्पो, गुजरात येथून भुईमुगाच्या शेंगा सुमारे २ टेम्पो, मध्य प्रदेश येथून लसूण सुमारे १० टेम्पो आवक झाली होती. तर स्थानिक भागातून झालेल्या आवकेमध्ये सातारी आले सुमारे ७०० गोणी, गवार ५ टेम्पो, भेंडी ८ टेम्पो, कोबी ५ टेम्पो, फ्लॉवर १० टेम्पो, टोमॅटो सुमारे ११ हजार क्रेट्स, तांबडा भोपळा आणि सिमला मिरची आणि काकडी प्रत्येकी १० टेम्पो, भुईमूग शेंगा सुमारे १०० गोणी, पुरंदर, वाई सातारा येथून मटार ८ टेम्पो, कांदा सुमारे ८० ट्रक, इंदूर, आग्रा भागातून बटाटा ४५ ट्रक इतकी आवक झाली होती, अशी माहिती मार्केटयार्ड येथील ज्येष्ठ आडतदार विलास भुजबळ यांनी दिली.

पालेभाज्यांचे भाव आवाक्यात

रविवारी गुलटेकडी येथील मार्केटयार्डात घाऊक बाजारात पालेभाज्यांची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. आवक जास्त असल्याने घाऊक बाजारात सर्वप्रकारच्या पालेभाज्यांच्या भावात घसरण झाली आहे. घाऊक बजारात पालेभाज्यांच्या एका गड्डीचा भाव दहा रुपयांच्या आत आला असला, तरी किरकोळ बाजारात पालेभाज्यांच्या एका गड्डीची दहा ते वीस रुपयांपर्यंत विक्री केली जात आहे. रविवारी (दि. २०) कोथिंबिरीची तब्बल दीड लाख हजार, तर मेथीची ७० हजार जुडी आवक झाल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

मागणीअभावी मासळीच्या दरात घसरण

गणेश पेठ मासळी बाजारात सर्वप्रकारच्या मासळीची कमी प्रमाणात होत आहे. मात्र, श्रावण महिना सुरू झाल्याने बाजारात मासळीच्या मागणीत घट झाली आहे. परिणामी मासळीचे दर दहा ते पंधरा टक्क्यांनी उतरले होते. तर, मागणीअभावी अंडी, चिकन, मटणाचे दर स्थिर होते. मासळी बाजारात रविवारी (दि. २०) खोल समुद्रातील मासळी ८ ते १० टन, खाडीच्या मासळीची सुमारे २०० ते २५० किलो, तर नदीच्या मासळीची ५०० ते ६०० किलो इतकी आवक झाली. आंध्र प्रदेश येथून रहू, कटला आणि सिलनची सुमारे १० ते १५ टन इतकी आवक झाली, अशी माहिती मासळीचे व्यापारी ठाकूर परदेशी, चिकन-अंड्यांचे व्यापारी रूपेश परदेशी आणि मटणाचे विक्रेते प्रभाकर कांबळे यांनी दिली.

पपई महागली तर खरबुजाच्या भावात घट

गुलटेकडी येथील मार्केटयार्ड फळबाजारात सध्या पावसामुळे सफरचंद वगळता, इतर बहुतांशी सर्व फळांची आवक चांगल्या प्रमाणात होत आहे. मागणीमुळे पपईच्या भावात गेल्या आठवड्याच्या तुलनेने किलोमागे पाच रुपयांनी वाढ झाली होती. मागणी घटल्याने खरबुजाच्या भावात घट झाली होती. इतर बहुतांशी सर्व प्रकारच्या फळांचे भाव गेल्या आठवड्याच्या तुलनेने स्थिर होते. गुलटेकडी येथील मार्केटयार्डमध्ये रविवारी केरळ येथून अननस ५ ट्रक, मोसंबी ६० ते ७० टन, डाळिंब ६० ते ७० टन, पपई २ ते ३ टेम्पो, खरबूज २ ते ३ टेम्पो, पेरू ६०० ते ७०० क्रेट्स, सीताफळ १५ ते २० टन, चिक्कू ६०० बॉक्स इतकी आवक झाली होती, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस.
कार्यालय: जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे

जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. : ३०९/२०२३/२५६३

अर्जदार
श्री आम्रपाली सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ता : स.नं.४०,अे-१, हिस्सा नं.४-१ बी/२बोपोडी, पुणे तर्फे चेअरमन, निलीमा मेहता
विरूद्ध
गैरअर्जदार / जमिनमालक
१. मे. राजजोगर बिल्डर्स, श्री.जे.के.वेद
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये श्री आम्रपाली सहकारी गृहरचना संस्था मर्या. स.नं.४०,अे-१, हिस्सा नं.४-१ बी/२बोपोडी, पुणे या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणे कामीचा अर्ज क्र. ३०९/२०२३ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०३/०८/२०२३ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने चेअरमन, निलीमा मेहता हजर गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. २९/०८/२०२३ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय. सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र.१ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
(संजय राऊत)
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे
पुणे
दि. १४/०८/२०२३

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस.
कार्यालय: जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे

जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. : ३१५/२०२३/२५६५

अर्जदार
प्रेमसागर सहकारी गृहरचना संस्था. पत्ता : स.नं.१८५, सिटीएस नं. ४२६९, चिंचवड, पुणे ४११ ०१९ तर्फे चेअरमन, सौ. अश्विनी राजेश बागर, सेक्रेटरी, श्री. अभिजित हिंगलाजे
विरूद्ध
गैरअर्जदार / जमिनमालक
१.मे. गीता बिल्डर्स / मे. पुजा एंटरप्रायजेस तर्फे प्रोप्रा. श्री. प्रेम व्ही. तिलवानी, रा. पिंपरी, पुणे ४११ ०१८.
२. सुगरानी माणिकभाई अत्तार, ३. चाँदबीबी इस्माईल अत्तार, ४. हारुन माणिकभाई अत्तार, ५. युसुफ माणिकभाई अत्तार नं. २ ते ५ रा. ७९९, दस्तूर मेहार रोड, पुणे ४११ ००१.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये प्रेमसागर सहकारी गृहरचना संस्था. पत्ता : स.नं.१८५, सिटीएस नं. ४२६९, चिंचवड, पुणे ४११ ०१९ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणे कामीचा अर्ज क्र. ३१५/२०२३ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०८/०८/२०२३ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. अंजली कलंत्रे हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र.२ व ४ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र.२ व ४ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. ३१/०८/२०२३ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय. सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र.२ व ४ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
(संजय राऊत)
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे
पुणे
दि. १४/०८/२०२३

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस.
कार्यालय: जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे

जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. : ३१३/२०२३/२५६४

अर्जदार
कुमार हेरंब सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता : स.नं. १८/५/५,(माणिकबाग) वडगाव बु. , ता. हवेली,जि.पुणे ४११ ०५१ तर्फे चेअरमन, श्री. सुहास मनोहर उपासनी
विरूद्ध
गैरअर्जदार / जमिनमालक
१.मे. कुमार एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रायटर, श्री. राजेंद्र किंसन रायकर, रा. माणिकबाग वडगाव बु., ता. हवेली,जि.पुणे ४११०५१
२. श्री. लक्ष्मण खंडू म्हेत्रे, रा.मु.पो. धायरी, ता. हवेली, जि. पुणे ४११ ०४१.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये कुमार हेरंब सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता : स.नं. १८/५/५, (माणिकबाग) वडगाव बु., ता. हवेली,जि.पुणे ४११ ०५१ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणे कामीचा अर्ज क्र. ३१३/२०२३ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०८/०८/२०२३ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. अंजली कलंत्रे हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र.२ व ४ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. ३१/०८/२०२३ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय. सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र.१ व २ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद
(संजय राऊत)
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे
पुणे
दि. १४/०८/२०२३

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस.
कार्यालय: जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे

जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक : २८५/२०२३

अर्जदार
भाग्योदय सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता : स. नं. २५/६/३/५, हिंगणे खुर्द, पुणे - ४११ ०५१ तर्फे (अ) चेअरमन,श्री. गिरीधर चित्राव, (ब) सेक्रेटरी,श्री. मंदार पवार.
विरूद्ध
गैरअर्जदार / जमिनमालक
(१) मे. भार्गव असोसिएटस, तर्फे भागीदार श्री. दत्तात्रय निवृत्ती शेवाळे, रा. धायरी, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०४१. (२) श्री. भाऊसाहेब बबनराव कुदळे, (३) श्री. विवेक अनंत कुदळे, क्र. २ व ३ रा. वडगाव बु. जि. पुणे - ४११ ०४१ . (४) श्री. कैलास मनोहर जाधव, (५) श्री. संजोग मुरलीधर काळे, (६) श्री. दत्तात्रय निवृत्ती शेवाळे, क्र. ४ ते ६ रा. धायरी, ता. हवेली,जि.पुणे - ४११०४१.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये भाग्योदय सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता : स. नं. २५/६/३/५, हिंगणे खुर्द, पुणे - ४११ ०५१ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. २८५/२०२३ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/०७/२०२३ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. अंजली कलंत्रे हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. २ ते ६ गैरअर्जदार. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. २ ते ६ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ३१/०८/२०२३ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. २ ते ६ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरातुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.
(संजय राऊत)
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे
पुणे
दि.: १७/०८/२०२३

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे
सांगवी विभागीय कार्यालय : क्रांती चौक, मेन रोड, नवी सांगवी, पुणे-२७

जाहीर समन्स

श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या. - अर्जदार
पत्ता : सागर कॉर्नर, प्लॉट नं. जी.पी. ८४, एम.आय.डी.सी., जी ब्लॉक, संभाजीनगर, चिंचवड, पुणे.
विरुद्ध

क्र.	प्रतिवादीचे नाव	प्रतिवादी क्र.	दावा क्र.	दावा रक्कम
१	दुर्गाराम वेन्नाराम चौधरी, हनुमान सुपर मार्केट, फिरोज पार्क सोसा., पवननगर, जुनी सांगवी.	२	३५४/२०२३	१८,०३,६६०/-
२	अमित अनिल गुप्ता, बारणे चाळ, क्रांतिवीर नगर, संचेती इंग्लिश स्कूलजवळ, थेरगाव, पुणे.	३	३५४/२०२३	१८,०३,६६०/-
३	दुर्गाराम वेन्नाराम चौधरी, हनुमान सुपर मार्केट, फिरोज पार्क सोसा., पवननगर, जुनी सांगवी.	१	३५५/२०२३	३२,३२,९४०/-
४	सोहनलाल तुलसीराम उणेचा, साबळे निवास, रामदेव स्टोअर्स, नेहरूनगर, पिंपरी, पुणे.	२	३५५/२०२३	३२,३२,९४०/-

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु प्रतिवादी यांना समन्स रूजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत.
उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक २४/०८/२०२३ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर राहावे.
या नोटिशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.
म्हणून आज दिनांक १०/०८/२०२३ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.
सही/-
(श्री. एस. एम. तांदळे)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे

ECOBOARD INDUSTRIES LIMITED (EIL)
ECOBOARD
In collaboration with the Earth
Registered office address:- 65/1A, ECOHOUSE, AKARSHAK BUILDING, Opp. Nal Stop, Karve Road Pune (M..H.)- 411004
CIN: L24239MH1991PLC064087 Email: cs.ecoboard@gmail.com
Tel: (020) 40111927 Website: www.ecoboard.in/www.ecoyou.in

NOTICE for 32nd Annual General Meeting (AGM) of 'Ecoboard Industries Limited' will be held on Monday, 11th September, 2023 at 11.00 A.M through Video Conference (VC)/ Other Audio Visual Means (OAVM).

In view of the massive outbreak of the COVID-19 pandemic, social distancing is a norm to be followed and pursuant to the Circular No. 14/2020 dated April 08, 2020, Circular No.17/2020 dated April 13, 2020 issued by the Ministry of Corporate Affairs followed by Circular No. 20/2020 dated May 05, 2020 and Circular No. 02/2021 dated January 13, 2021 and all other relevant circulars issued from time to time, have permitted the holding of AGM through VC/OAVM. Accordingly, the AGM will be convened through VC/OAVM and the business may be transacted through voting by electronic means. For consider a member for remote e-voting, the cut-off date is 01/09/2023. For detailed instructions on attending the AGM Members/Shareholders are requested to go through the AGM notice.

Pursuant to the applicable circulars and Rule 20 of Companies (Management and Administration) Rules, 2014, the Annual Report 2022-23 and Notice of 32nd AGM are being sent to electronic mode to Members whose e-mail address is register with the Company/RTA or with DP(s). Annual Report has been uploaded on the website of the Company at https://www.ecoboard.in/investor-relations & https://www.ecoyou.in/investor-relations. The Notice can also be accessed from the websites of the BSE at www. bseindia.com and the AGM Notice is also available on the website of NSDL (agency for providing the Remote e-Voting facility) i.e. www.evoting.nsdl.com. The Members are hereby informed that:

(i) The remote e-voting period commences on 04/09/2023 (09.00 A.M) and ends on 10/09/2023 (05.00 P.M). Member may note that remote e voting shall not be allowed beyond the above said period.
(ii) After remote e-voting prior to the AGM you may attend AGM but shall not entitle to vote again.
(iii) Member may access to NSDL e-Voting system through https://www.evoting.nsdl.com/_under shareholders login.
(iv) Members are permitted to join the AGM before 15 minutes and upto 15 minutes after such scheduled time.
(v) The documents referred to in AGM notice are available for inspection. Members may write to the Company's email id cs.ecoboard@gmail.com.
(vi) Scrutinizer for remote e-voting process and voting at AGM is PCS Mr. Satish Kolhe
(vii) Result declared along with the report of scrutinizer shall be placed on Company's website at www.ecoboard.in and on RTA website.
(vii) For any Shareholders queries please write at cs.ecoboard@gmail.com at least 07 days prior to meeting and register yourself as a speaker by mentioning name, demat account number/folio number, email id, and mobile number.

In case shareholders/members have any queries regarding e-voting, they may refer ('FAQs') and e-voting user manual available on the website www.evoting.nsdl.com under 'Downloads Section' or You can also contact NSDL on toll free number 1800-1020-990 and 1800 22 44 30 or NSDL, at designated e-mail IDs: evoting@nsdl.co.in, who will address the grievances related to electronic voting.

(By order of the board)
For Ecoboard Industries Limited
Shilpa Soni
Company Secretary
Place: Pune
Date: August 21, 2023